महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
कस्तुरी इमारत, तळमजला, ज. टाटामार्ग,
पेट्रोलियम हाऊसच्या समोर, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०
**दूरध्वनी क्र.:** ०२२- २२८८०११६/११८ Extn. ४१०
Email: aao.prashakosha-mh@gov.in

दरपत्रक क्र. २/२०२६ / 456 दिनांक : 14 MAY 2026

**बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ (वाहनचालक) पुरविणाऱ्या संस्थांकडून दरपत्रक मागविणेबाबत.**

संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई कार्यालयातील वाहनाकरिता एक वाहनचालकाचे पद अकरा महिन्याच्या कालावधीसाठी बाह्ययंत्रणेमार्फत भरण्यासाठी वाहनचालक पुरविणाऱ्या स्थानिक नोंदणीकृत संस्थांकडून दि. १८.०५.२०२६ ते दि. २६.०५.२०२६ या कालावधीत दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

दरपत्रक सादर करणेसाठी सविस्तर तपशील, बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थाकरिता तसेच आवश्यक अटी, शर्ती इ. विषयक तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ. | पक्षकार :- |
|---|---|
| | करारनाम्याचे पक्षकार हे कंत्राटदार आणि (ज्यांना काम सोपविले आहे) सहसंचालक (कोषागारे), लेखा व कोषागारे, मुंबई हे राहतील. |

| ब. | वाहनचालक उमेदवारांसाठी अटी व शर्ती :- |
|---|---|
| १. | दिनांक ०१.०५.२०२६ रोजी उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे व कमाल ५५ वर्षे असावे. |
| २. | मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) मधील तरतुदीनुसार सक्षम अनुज्ञप्ती प्राधिकारी संबंधित उमेदवारास जारी केलेले हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन (एच.एम.व्ही./एल.एम.व्ही. वाहन) चालविण्याचा परवाना/ मूळ अनुज्ञप्तीपत्र (Driving Licence) आवश्यक. |
| ३. | उमेदवार किमान माध्यमिक शालांत परीक्षा (१० वी) उत्तीर्ण असावा. |
| ४. | उमेदवारास शासकीय/निमशासकीय/खाजगी संस्थेमध्ये हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन (एच.एम.व्ही./एल.एम.व्ही.वाहन) चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असल्याचे संस्थेचे प्रमाणपत्र आवश्यक. |
| ५. | उमेदवार वाहन चालविण्यासाठी मानसिक/शारीरिकदृष्ट्या पात्र असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आवश्यक. उमेदवाराचा वाहन चालविण्याचा अभिलेख स्वच्छ असावा. |
| ६. | उमेदवारास मराठी, हिंदी भाषा वाचता व बोलता आणि इंग्रजी भाषा वाचता येणे आवश्यक आहे. |
| ७. | उमेदवार निर्व्यसनी असावा, गुन्हेगारी पार्श्वभुमीचा नसावा. |
| ८. | उमेदवारास वाहन दुरुस्तीची प्राथमिक माहिती असावी. |
| ९. | वाहनचालकाची वैयक्तिक माहिती पुरविणे आवश्यक राहील. उदा. शैक्षणिक अर्हता, कायम व सध्याचा पत्ता, नमुना स्वाक्षरी, अलीकडे काढलेला पासपोर्ट साईज फोटोग्राफ व बँक खात्याचा तपशील. |

| क. | कंत्राटी वाहनचालकाची जबाबदारी :- |
|---|---|
| १. | वाहनचालकाचा प्रत्येक दिवसाचा कामाकाजाचा कालावधी ०९ तास ४५ मिनिटे राहील. |
| २. | संचालक/सहसंचालक हे ज्या वेळी कामावर बोलावतील त्यावेळेस तत्परतेने कामावर यावे लागेल. |
| ३. | वाहन स्वच्छ व सुस्थितीत ठेवणे ही कंत्राटी वाहनचालकाची जबाबदारी असेल. |
| ४. | कंत्राटी वाहनचालकाचे कार्यक्षेत्र हे महाराष्ट्र राज्य संबंधित जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र असेल, शासकीय कामानिमित्त आवश्यकता भासल्यास जिल्ह्याबाहेरील क्षेत्रात वाहन चालवावे लागेल. |

| ड. | वाहन चालकाला अनुज्ञेय असणारे पारिश्रमिक, भत्ते व त्यांचे प्रदान : |
|---|---|
| १. | उक्त पदासाठी किमान वेतन अधिनियम १९४८ कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहील. |
| २. | उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या सुधारीत अधिसूचना दि. ०४.०२.२०२६ नुसार कंत्राटी किमान वेतनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहेत. तसेच विविध कामगार कायद्यान्वये वेळोवेळी निश्चित केलेल्या दरानुसार विशेष/ महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, इतर भत्ते व वजावटी उदा. भविष्य निर्वाह निधी/ राज्य कामगार विमा योजना/व्यावसायिक कर/बोनस/कमगार कल्याण निधी या दायित्वांचा समावेश करून कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन व अनुषंगिक भत्ते प्रदान करणे तसेच नियमातील तरतूदीनुसार त्याबाबतची दायित्वे संबंधित प्राधिकरणाकडे भरणे बंधनकारक राहील. |
| ३. | वाहनचालकाचा प्रत्येक दिवसाचा कामकाजाचा कालावधी ०९ तास ४५ मिनिटे राहील. या व्यतिरिक्त पुढे काम झाल्यानंतर वित्त विभाग, शासन निर्णय दि. ०७.०८.२०२३ अन्वये किंवा शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या प्रचलित दराप्रमाणे अतिकालिक भत्ता लागू राहील. |
| ४. | कामाच्या दिवशी/रविवार/सुट्टीच्या दिवशी ९ तास ४५ मिनिटापेक्षा (भोजन समय धरुन) आणि रविवार व सुट्टीच्या दिवशी सुद्धा काम केल्यास दर तासाला रु. १००/- भत्त्याचा दर असून, अर्धा तास व त्यापुढील कामासाठी तो पूर्ण तास गणण्यात येईल. वाहनचालकास एका महिन्यात मिळणाऱ्या अतिकालिक भत्त्याची रक्कम त्याच्या पगाराच्या ३० % पेक्षा जास्त असणार नाही. |

| इ. | दरपत्रकासंबंधीच्या अटी व शर्ती :- |
|---|---|
| | अ. तांत्रिक लिफाफा |
| १. | संबंधित संस्था/ अर्जदार हे खालीलपैकी एका कायद्यांतर्गत नोंदणीकृत असावी. (नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी.)<br>• मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८<br>• भागीदारी संस्था अधिनियम, १९३२<br>• सहकारी संस्था अधिनियम, १९६१<br>• कंपनी अधिनियम, १९५६ |
| २. | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखंस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि. ०१.१२.२०१६ मधील प्रकरण क्र. ३/अ.क्र.३.१ व प्रकरण क्र.६/परिशिष्ट ८ मधील तरतुदीनुसार निविदा/ दरपत्रक अर्जासोबत निविदा शुल्क रु. १,९००/- व बयाना रक्कम रु. ९,५००/- धनाकर्ष (राष्ट्रीयकृत बँकेचा) जोडावा. धनाकर्ष लेखा अधिकारी (र व का), लेखा व कोषागारे, मुंबई या नावाने काढावेत. तसेच लेखा अधिकारी (र व का) यांनी प्राप्त निविदा शुल्क/बयाना रक्कम योग्य लेखाशिर्षाखाली जमा करावे. |

| | |
|---|---|
| | ~~फक्त~~ रोजगार व स्वयंरोजगार विभाग, शासन निर्णय क्र. रोस्वरो २००२/प्र.क्र.२६७/रोस्वरो-१, दिनांक १७.०८.२००२ मधील अ.क्र.८ अन्वये शासकीय किंवा निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांमध्ये सेवेचा पुरवठाकरिता निविदा/दरपत्रक भरताना निविदा शुल्क/बयाणा रक्कम भरण्याच्या अटीतून पंजीकृत बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना / लोकसेवा केंद्राना सुट देण्यात आली आहे. त्याअनुषंगे आवश्यक प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे. याव्यतिरिक्त अन्य शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनामत रक्कम भरण्यापासून सूट मिळण्याची अट या दरपत्रिकेस लागू होत नसल्याने त्याअंतर्गत मोडणाऱ्या संस्थांना अनामत रक्कम भरणे अनिवार्य असेल. |
| ३. | आयकर अधिनियमाप्रमाणे दरमहा अदा होणाऱ्या देयकामधून नियमानुसार आयकर वजा करण्यात येईल. यासाठी पॅनकार्डची छायांकित प्रत जोडण्यात यावी. |
| ४. | वस्तू व सेवाकर कायदा, २०१७ नुसार नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र व क्रमांक जोडण्यात यावे. |
| ५. | वाहनचालकाच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधी/ राज्य कामगार विमा योजना (EPF/ESIC) अंतर्गत वर्गणी वजा करण्यात येत असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. |
| ६. | मागील २ वर्षाच्या कालावधीत किमान २ शासकीय / निमशासकीय कार्यालयांना कंत्राटी तत्त्वावर वाहनचालक पुरविल्याबाबत व त्यांचे काम समाधानकारक असल्याचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. |
| ७. | संस्थेची वार्षिक उलाढाल ही मागील दोन वर्षासाठी सरासरी दहा लाखांपेक्षा कमी नसावी. तसेच सनदी लेखापालांकडून प्रमाणित करण्यात आलेल्या मागील दोन वर्षांच्या ताळेबंदाच्या प्रती दरपत्रक अर्जासोबत जोडण्यात याव्यात.<br>(आर्थिक वर्ष - २०२४-२५, २०२५-२६) |
| ८. | नजीकच्या कालावधीमध्ये GST भरल्याबाबतची संबंधित विभागाकडील चलनाची प्रत जोडण्यात यावी. |
| ९. | नजीकच्या कालावधीमध्ये व्यवसाय कर भरल्याबाबतची संबंधित विभागाकडील चलनाची प्रत जोडण्यात यावी. |
| १०. | संस्थेचे नांव काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे, संस्थेविरोधात पोलिस चौकशी/तपास/न्यायालयीन प्रकरणे चालू नसल्याचे हमीपत्र संस्थेच्या चालकांचे सहीनिशी जोडण्यांत यावे. |
| ११. | मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्र (IT return) भरल्याची प्रत जोडावी.<br>(आर्थिक वर्ष - २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६) |
| | **ब. व्यापारी लिफाफा :-** |
| १. | कंत्राटी वाहनचालकासाठी किमान वेतन अधिनियम १९४८ कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहील. |
| २. | उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या सुधारीत अधिसूचना दि. ०४.०२.२०२६ नुसार व किमान वेतन अधिनियमातील तरतूदीनुसार द्यावयाच्या मासिक पारिश्रमिक रक्कम दिलेल्या विहित नमुन्यात सादर करावी. |
| ३. | कंत्राटदाराने/ पुरवठादाराने/ निविदाकाराने वरील किमान वेतनानुसार मासिक पारिश्रमिक दर अदा करावे. |
| ४. | कंत्राटदार/पुरवठादाराचे मान्य दर हे कार्यारंभ आदेश दिल्याच्या तारखेपासून ११ महिन्यांसाठी लागू राहतील. दर कराराच्या कालावधीत कोणतीही दरवाढ मंजूर केली जाणार नाही. |

| **ई** | **दरपत्रके छाननीबाबत :-** |
|---|---|
| १. | कंत्राटदाराने/ पुरवठादाराने नमूद केलेले दर हे दरपत्रके उघडण्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या कालावधीपर्यंत वैध /विधीग्राह्य असतील. |
| २. | दरपत्रके शक्य झाल्यास विहित केलेल्या दिनांकास उघडण्यात येतील. तांत्रिक दरपत्रकामध्ये पात्र ठरलेल्या पुरवठादाराचेच लिफाफे उघडण्यात येतील. |

| | |
|---|---|
| ३. | तांत्रिक दरपत्रक उघडल्यानंतर दरासंबंधीचे लिफाफे उघडण्यास काही अडचणी आल्यास दरपत्रकाचा लिफाफा उघडला जाणार नाही. किमान ३ वैध दरपत्रके असतील तरच दराचा लिफाफा उघडण्यात येईल. त्यामधून पात्र ठरलेल्या कंत्राटदाराचे / पुरवठादाराचे न्युनतम किमतीचे दर स्वीकृत करण्यात येतील. |
| ४. | प्राप्त झालेले दर हे बाजारातील प्रचलित दरापेक्षा अवास्तव वा जास्त असणार नाहीत.<br>कंत्राटदाराने सेवा आकार नमूद करताना भारत सरकार, वित्त विभाग, खरेदी धोरण विभाग यांच्या दि. ०६.०१.२०२३ च्या कार्यालयीन ज्ञापनानुसार सेवा शुल्क ३.८५ % पेक्षा कमी व ७ % पेक्षा जास्त सेवा आकार आकारु नये. |
| ५. | शासनाने ठरवून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार दरपत्रके छाननीबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार कंत्राट मूल्याप्रमाणे संबंधित समितीकडे किंवा संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात येतील. सदर निर्णय कंत्राटदार/ पुरवठादार यांना मान्य करणे बंधनकारक राहील. |

| फ. | **पात्र निविदाकाराने/ पुरवठादाराने करावयाच्या कार्यवाहीबाबत :-** |
|---|---|
| १. | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र. ८२/भाग- III/उद्योग-४, दि. ०१.१२.२०१६ मधील प्रकरण क्र. ४ /अ.क्र.४.६ मधील तरतुदीनुसार निविदा मान्य झालेल्या कंत्राटदारास/पुरवठादारास निकाल कळविल्यानंतर १५ दिवसांच्या आत सुरक्षा ठेव अनामत (Performance Security Deposit) रुपये १०,०००/- च्या मुख्यालयाच्या ठिकाणी प्रदेय असणारा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) लेखा अधिकारी (र व का), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे नावे द्यावा लागेल. विहित मुदतीत सुरक्षा ठेव अनामत जमा न केल्यास विहित नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. लेखा अधिकारी (र व का) यांनी प्राप्त सुरक्षा ठेव रक्कम योग्य लेखाशिर्षाखाली जमा करावे. |
| २. | पात्र कंत्राटदाराने /पुरवठादाराने कामाचे आदेश देण्यापूर्वी रुपये ५००/- चे मुद्रांक पेपरवर करारनामा करून देणे आवश्यक राहील. |
| ३. | करारनामा केल्यानंतर कंत्राटदाराने दिलेल्या विहित मुदतीत आवश्यकतेप्रमाणे मनुंष्यबळ पुरवठा न केल्यास विहित नियमानुसार विलंब आकार/दंड आकारला जाईल. सदर दंडाची वसुली प्रशासकीय सेवा आकार किंवा सुरक्षा ठेव अनामत रकमेतून करण्यात येईल. |
| ४. | कंत्राटदाराकडून/पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रद्द करण्यात येतील व त्याला कोणतीही रक्कम प्रदेय राहणार नाही. जमा केलेल्या सुरक्षा ठेव अनामत रक्कम जप्त केली जाईल. |
| ५. | करारनाम्याच्या कालावधीत कोणतीही तक्रार प्राप्त न झाल्यास, करारनाम्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर अथवा करारनामा संपुष्टात आल्यानंतर सदर रक्कम मुक्त करण्यात येईल. |
| ६. | संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता निविदाधारकास १ महिन्याची आगाऊ नोटीस देऊन करारनामा रद्द करण्याचा/ संपुष्टात आणण्याचा अधिकार असेल. |

| ग. | **मासिक पारिश्रमिक अदा करण्याबाबतची कार्यपद्धती :-** |
|---|---|
| १. | वरीलप्रमाणे मनुष्यबळ पुरवठा केल्यानंतर लेखा अधिकारी (प्रशा कोषा शाखा), लेखा व कोषागारे, मुंबई यांचेकडून रुजू झाल्याबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल. लेखा अधिकारी (र व का शाखा), लेखा व कोषागारे, मुंबई यांचेकडून संबंधित उमेदवाराची उपस्थितीची हजेरीपटावर नोंद घेतील. |

| | |
|---|---|
| २. | लेखा अधिकारी (र व का शाखा), लेखा व कोषागारे, मुंबई यांनी प्रत्येक महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या शेवटच्या दिवशी संबंधित उमेदवाराचे उपस्थिती प्रमाणपत्र कंत्राटदार/पुरवठादार यांचेकडे पाठविणे आवश्यक राहील. |
| ३. | कंत्राटदाराने/पुरवठादाराने उपस्थिती प्रमाणपत्राच्या प्रतीसह महिन्याच्या ०५ तारखेपर्यंत देयक सादर करावे. देयक पारित झाल्यानंतर संबंधित कंत्राटदार/पुरवठादार यांना ई-प्रदान (NEFT/ECS/RTGS) करण्यात येईल.<br>बाह्ययंत्रणेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सफाईगारास मासिक पारिश्रमिक त्यांच्या बँक खात्यामध्ये अदा केल्याचा पुरावा संबंधित संस्थेस लेखा अधिकारी (र व का), लेखा व कोषागारे, मुंबई यांना प्रत्येक महिन्यात सादर करावा लागेल, त्यानंतरच पुढील महिन्याचे वेतन संस्थेस अदा करण्यात येईल. |
| ४. | कंत्राटदारास देयक सादर करण्यास विलंब झाला तरी देखील मासिक पारिश्रमिक कंत्राटदाराने/पुरवठादाराने प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत संबंधित उमेदवाराच्या बँक खात्यावर रेखांकित धनादेशाद्वारे (Account Payee Cross Cheque)/NEFT/ECS/RTGS द्वारे जमा करणे आवश्यक राहील. |
| ५. | कंत्राटदाराने /पुरवठादाराने कंत्राटी वाहन चालकाला दिलेल्या पारिश्रमिकाच्या /इतर भत्त्यांच्या प्रदानाबाबतची छायांकित प्रत दर महा सादर केल्याशिवाय कंत्राटदाराला/पुरवठादाराला पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही. |
| ६. | कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी वाहनचालकाला मासिक वेतनचिठ्ठी देणे आवश्यक राहील. |
| ७. | कंत्राटदाराने/पुरवठादाराने कंत्राटी वाहनचालकांना किमान वेतन कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी वेतन दिल्यास अथवा दायित्वाची रक्कम ठरलेल्या दराप्रमाणे कपात करून संबंधित प्राधिकरणाकडे जमा न केल्यास अथवा संबंधित उमेदवाराकडून ज्यादा रक्कम घेतल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यास व तसे पुरावे आढळल्यास संबंधित कंत्राटदार/पुरवठादार किमान वेतन कायद्यातील तरतुदीप्रमाणे कारवाईस पात्र असेल. |
| ८. | कंत्राटदारास/पुरवठादारास रक्कम अदा करताना आयकर व वस्तु व सेवाकर (GST) कायद्यातील तरतूदीनुसार आयकराची/ वस्तु व सेवाकराची रक्कम कपात करून उर्वरित रक्कम अदा केली जाईल. वस्तु व सेवा कर (GST) २०१७ व महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कायद्यांतर्गत अधिसूचना क्र. ५०/२०१८ मधील तरतूदीनुसार वस्तू व सेवा विषयक एका संविदाखालील मूल्य रु. २,५०,०००/- पेक्षा अधिक असेल अशा करपात्र वस्तू व किंवा सेवा यांच्या पुरवठ्यासाठी प्रदान करण्यांत येणाऱ्या रकमेतून विहित दरानुसार कपात करण्याची लेखा अधिकारी (र व का शाखा), लेखा व कोषागारे, मुंबई यांना बंधनकारक राहील. तसेच याबाबत शासनाकडून वेळोवेळी लागू करण्यात आलेल्या नियमांप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील. |
| ९. | व्यवसाय कर भरण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदार/पुरवठादार यांची राहील. |
| १०. | उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१३/कामगार-८, दि. २२.०२.२०१९ नुसार कंत्राटी कर्मचाऱ्यास अदा करण्यासंबंधीच्या "जोडपत्र अ" मधील तरतुदी कंत्राटदारास/ पुरवठादारास/निविदाकारास बंधनकारक राहील. |
| ११. | लेखा अधिकारी (र व का शाखा), लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत कंत्राटदारास मासिक पारिश्रमिकाची अदायगी होणार असल्यामुळे दायित्व नियमातील तरतुदीनुसार जमा केले जात असल्याबाबतची खातरजमा त्यांचे स्तरावरून करणे आवश्यक राहील. करारनामा समाप्त झाल्यानंतर कंत्राटदारास सुरक्षा ठेव अनामत अदा करण्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र लेखा अधिकारी (प्रशा कोषा शाखा), लेखा व कोषागारे, मुंबई यांचेकडे सादर केल्यानंतर अनामत रक्कम अदा करण्याबाबतचे आदेश प्रशा कोषा शाखेकडून निर्गमित करण्यात येतील. |

| घ. | **बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ (वाहनचालक) पुरविणाऱ्या संस्थांसाठी अटी व शर्ती :-** |
|---|---|
| १. | वाहनचालक उमेदवाराची कंत्राटी सेवा चालू ठेवण्याचे /संपुष्टात आणण्याचे सर्व अधिकार संचालक, लेखा व कोषागारे, मुख्यालय, मुंबई यांचे स्वाधीन राहतील. |
| २. | वाहनचालकाच्या निष्काळजीपणामुळे वाहनाचे काही नुकसान झाल्यास संस्थेस त्याच्या दुरुस्तीचा खर्च करावा लागेल. तसेच दुर्देवाने वाहनचालकास गंभीर स्वरूपात इजा झाल्यास त्याच्या वैद्यकीय खर्चाचे अथवा नुकसान भरपाईचे कोणतेही उत्तरदायित्व हे संचालनालयाकडे राहणार नाही. त्याची पूर्णत: जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. |
| ३. | वाहनचालक वेळेवर कार्यालयात उपस्थित न झाल्यास किंवा विनापरवानगी गैरहजर राहिल्यास त्याचे त्या दिवसाचे वेतन अदा करण्यात येणार नाही. |
| ४. | वाहनचालक रजेवर असल्यास पर्याची वाहनचालक पुरविणे बंधनकारक राहील. |
| ५. | वाहनचालक उमेदवारास भौगोलिक (मुंबई शहर/उपनगर व बाहेरील जवळपासच्या जिल्ह्यांचे) ज्ञान असणे आवश्यक. |
| ६. | उमेदवाराच्या सचोटी / चारित्र्याबाबतचे पोलीस खात्याचे प्रमाणपत्र हजर झाल्यावर सादर करावे लागेल. |
| ७. | कायम स्वरुपी शासकीय नोकरीसाठी कार्यालयाकडे/ शासनाकडे न्यायालयाकडे/ दावा अथवा खटला करणार नाही, अशा आशयाचे हमीपत्र सेवेत हजर होताना सादर करणे बंधनकारक. |
| ८. | कोणतीही दरपत्रक स्वीकारण्याचा किंवा एखादी /सर्वच दरपत्रक प्रक्रिया कारण न देता नाकरण्याचा हक्क संचालनालयास राहील. |

वर नमूद अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या संस्थांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

दरपत्रक अर्ज दिनांक १८.०५.२०२६ ते दि. २६.०५.२०२६ या कालावधीत https://www.mahakosh.gov.in संकेतस्थळावर Tenders and Quotations या दुव्याखाली उपलब्ध राहील.

Sd/-
सहसंचालक (कोषागारे)
संचालनालय, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

ठिकाण : मुंबई
दिनांक : १३.०५.२०२६

D:\snehalata mangale back up dt 05.06.2023\snehalata back up of pc 05.08.2021\back up\YEAR 2023\कार्या. 1\बाह्ययंत्रणा\वाहनचालक\DAT वाहनचालक.docx

## तांत्रिक लिफाफा

| | | |
|---|---|---|
| १ | कंत्राटदाराचे संस्थेचे/ कंपनीचे नांव व पूर्ण पत्ता | |
| | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण परिक्षेत्रातील कार्यालयाचा तपशिलवार पत्ता | |
| २ | संस्था/ कंपनी/ फर्म असल्यास | |
| | नोंदणीचा तपशील | |
| | अ) कंत्राटदाराचा/संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण पत्ता | |
| ३ | संपर्काचा तपशील | |
| | अ) दूरध्वनी क्रमांक | |
| | ब) भ्रमणध्वनी | |
| | क) ईमेल आयडी | |
| ४ | दुकान परवाना क्रमांक / प्रमाणपत्र (नुतनीकरणासह) | |
| ५ | EPF रजिस्ट्रेशन क्रमांक | |
| ६ | ESIC रजिस्ट्रेशन क्रमांक | |
| ७ | वस्तू व सेवा कर नोंदणी क्रमांक | |
| ८ | व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र | |
| ९ | शासकीय/निमशासकीय कार्यालयात कंत्राटी तत्त्वावर वाहनचालकाचा पुरवठा केला असल्याबाबत संबंधित विभागाने निर्गमित केलेले कोणतेही प्रमाणपत्र | |
| १० | संस्थेचे/कंपनीचे/मालकाचे आयकर Pan Card क्रमांक (प्रत) | |
| ११ | मागील ३ वर्षाचे Income Tax Return | |
| १२ | सनदी लेखापालाकडून प्रमाणित करण्यात आलेल्या मागील दोन वर्षाच्या ताळेबंदाच्या प्रती | |
| १३ | काळ्या यादीत न टाकल्याबाबत/बंदी न घातल्याबाबत प्रमाणपत्र | |
| १४ | अनुभव प्रमाणपत्र | |

१. दरपत्रक मंजूर करण्याचे सर्व अधिकार खरेदी समितीकडे राखीव आहेत हे मला मान्य आहे.

२. या दरपत्रकातील अटी व शर्ती मला संपूर्णपणे मान्य आहेत. तसेच अटी व शर्तीबाबत माझी कोणतीही तक्रार नाही.

३. दरपत्रकासमवेतच्या करारनाम्यातील सर्व बाबी मला विनाशर्त मान्य आहेत.

४. प्रमाणपत्रे सोबत जोडली आहेत.

निविदाकाराची सही
रबर स्टँपसह

## व्यापारी लिफाफा

| अ.क्र. | बाब | | | कुशल कामगारासाठी दर (प्रतिमाह) रुपया मध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | मुळ वेतन Basic Pay | | | १८,९७५ |
| २ | विशेष भत्ता (Special Allowance) | | | ७२५ |
| ३ | एकूण किमान वेतन | | A | १९,७०० |
| I | (+) घरभाडे भत्ता @५% एकूण किमान वेतनावर | ५ % | | ९८५ |
| Ii | (+) बोनस उपदान @ ८.३३% एकूण किमान वेतनावर | ८.३३ % | | १,६४१ |
| Iii | (+) रजा उपदान @ १.२८% एकूण किमान वेतनावर | १.२८ % | | २५२ |
| ४ | एकूण किमान वेतन व भत्ते | | B | २२,५७८ |
| ५ | कर्मचाऱ्याच्या किमान वेतनातून वजा करावयाच्या कायदेशीर दायित्वाच्या बाबी | | | |
| I | भविष्य निर्वाह निधी @ १२% एकूण किमान वेतनावर | १२ % | | २,३६४ |
| ii | प्रशासकीय दर भ.नि.नि. करिता @ १.१५ % एकूण किमान वेतनावर | १.१५ % | | २२७ |
| Iii | राज्य कामगार विमा योजना @ ३.२५ % एकूण किमान वेतन व भत्तेवर | ३.२५ % | | ७३४ |
| Iv | कामगार कल्याण निधी | | | ६ |
| | कायदेशीर दायित्वाच्या एकूण वजाती | | C | ३,३३१ |
| ६ | एकूण किमान वेतन व भत्ते | | D (B+C) | २५,९०९ |
| ७ | **सेवा आकार कंत्राटदाराने नमूद करणे -** | | E | |
| ८ | कंत्राटदारास अदा करावयाचे एकूण किमान वेतन व भत्ते | | F (D+E) | |
| ९ | सेवा कर (service tax) अ.क्र. ८ वर येणाऱ्या रकमेवर सेवा कराची आकारणी | | G | |
| १० | कंत्राटाची एकूण किंमत सेवा कर धरून | | H (F+G) | |
| ११ | देय मासिक पारिश्रमिक खालीलप्रमाणे | | | |
| १२ | मासिक पारिश्रमिकामधून वजा होणाऱ्या कायदेशीर दायित्वाच्या बाबी | | | |
| I | (i) भविष्य निर्वाह निधी @ १३ % एकूण किमान वेतनावर | १३ % | | २,५६१ |
| Ii | (-) राज्य कामगार विमा योजना @ ०.७५ % | ०.७५ % | | १४८ |
| Iii | (-) व्यवसाय कर | | | २०० |
| १३ | कायदेशीर दायित्वाच्या एकूण वजाती | | I | २,९०९ |
| १४ | कंत्राटी कर्मचाऱ्यास अदा करावयाची रक्कम | | J (B-I) | १९,६६९ |

निविदाकाराची सही
रबरी स्टॅंपसह

## काळ्या यादीत न टाकल्याबाबत/ बंदी न घातल्याबाबत प्रमाणपत्र

मी/आम्ही श्री. व श्री. मालक/ संचालक (संस्थेचे नाव) शपथपूर्वक घोषित करतो की उक्त नमूद संस्था वर्षापासून मनुष्यबळ पुरवठ्याचे काम करत आहे. त्यानुसार मी/आम्ही असे स्वप्रमाणित करतो की, दरपत्रक/निविदा भरणेचे दिनांकास म्हणजेच दि. रोजी मनुष्यबळ पुरविण्याचे काम समाधानकारकरित्या पार न पाडल्यामुळे कोणत्याही केंद्र शासकीय, राज्य शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयाने मेसर्स (संस्थेचे नाव) या संस्थेस काळ्या यादीत टाकण्यात आलेले नाही अथवा संस्थेकडून मनुष्यबळ पुरवठ्याचे काम करून घेण्यास बंदी घालण्यात आलेली नाही. तसेच या संस्थेविरुद्ध मनुष्यबळ पुरवठ्याच्या कामाच्या अनुषंगाने भारतामधील कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा/ खटला प्रलंबित नाही. तसेच आमचेविरुद्ध कोणत्याही पोलीस स्थानकात गुन्हा दाखल नाही.

उपरोक्तप्रमाणे करण्यात आलेले निवेदन हे संपूर्णपणे सत्य आहे.

स्वाक्षरी

दिनांक :-

ठिकाण :-

संपूर्ण नाव : -

संस्थेचा /कंपनीचा रबरी शिक्का पत्यासहित :-